दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २१५ । गुरुवार २१ मे २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## विधानपरिषदेसाठी नगरमध्ये जुळवाजुळव सुरु

# सचिन जगताप, प्राजक्त तनपुरे, चंद्रशेखर घुले, प्रताप ढाकणे यांची नावे आघाडीवर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर– पुढील महिन्यात होणा–या विधानपरिषद निवडणुकीसाठी अहिल्यानगर मतदारसंघासाठी जुळवाजुळव सुरू झाली आहे. या जागेवर दिवंगत आमदार अरुणकाका जगताप यांच्या जागी वर्णी लागावी, यासाठी त्यांचे पुत्र तथा आमदार संग्राम जगताप यांचे बंधू सचिन जगताप हे आग्रही आहेत. याशिवाय नुकतेच राहुरी मतदारसंघातून ऐनवेळी माघार घेतलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे, माजी आमदार चंद्रशेखर घुले, प्रताप ढाकणे यांची नावे आघाडीवर आहेत.**

अहिल्यानगर विधानपरिषद मतदारसंघात दिवंगत अरुणकाका जगताप यांनी दोनवेळा म्हणजे सुमारे बारा वर्षे प्रतिनिधीत्व केले. दिनांक १ जानेवारी २०२२ रोजी त्यांचा कार्यकाळ संपला. त्यानंतर तब्बल चार वर्षांनी विधानपरिषद निवडणूक जाहीर झाली. यादरम्यान आमदार अरुणकाका जगताप यांचे मागील वर्षी निधन झाले. त्यांच्या जागेवर आता कोण उमेदवारी करणार, याबाबत उत्सुकता असताना त्यांचे पुत्र तथा आमदार संग्राम जगताप यांचे मोठे बंधू माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांनी ही निवडणूक लढण्याची तयारी चालविली आहे. याशिवाय नुकत्याच पार पडलेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत ऐनवेळी थांबण्याचा निर्णय घेतलेले माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचेही नाव चर्चेत आहे. ते कोणत्या पक्षाकडून लढणार याबाबत संदिग्धता आहे. तर महाविकास आघाडीकडून शेवगावचे माजी आमदार तथा जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले तसेच केदारेश्वर साखर कारखान्याचे सर्वेसर्वा प्रताप ढाकणे यांची नावे चर्चेत आहेत.



### आमदार संग्राम जगताप यांची भूमिका महत्त्वाची



दिवंगत आमदार अरुणकाका जगताप यांचे आमदार होण्याचे स्वप्न विधानपरिषद निवडणुकीच्या माध्यमातून पूर्ण झाले. सलग दोन टर्म त्यांनी अहिल्यानगर मतदाररसंघाचे प्रतिनिधीत्व केले. याच काळात अरुणकाका यांच्या मार्गदर्शनाखाली संग्राम जगताप यांचे राजकीय नेतृत्व घडले. महापौरपदी विराजमान होऊन त्यांनी नंतर आमदारकीची तयारी सुरू केली व सन २०१४ मध्ये ते पहिल्यांदा आमदार झाले. सध्या सलग तिस–यांदा ते नगर शहर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करत आहेत. या वाटचालीत त्यांना अरुणकाकांचे खंबीर पाठबळ लाभले. आता संग्राम जगताप हे राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) आमदार असले तरी त्यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी घनिष्ठ संबंध आहेत. जिल्ह्यात भाजपची धुरा वाहणा–या विखे कुटुंबाशी त्यांचा चांगला घरोबा असून, नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत विखे–जगताप जोडीने यश मिळवले. अरुणकाका यांच्यानंतर संग्राम जगताप हे आपल्या मोठ्या बंधूला विधानपरिषदेची उमेदवारी मिळवून देण्यात यशस्वी ठरतात का? तसेच या निवडणुकीसाठी त्यांना विखे पिता–पुत्राचे किती सहकार्य मिळते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### प्राजक्त तनपुरेंचे पुनर्वसन होणार?

माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी नुकत्याच पार पडलेल्या राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत ऐनवेळी थांबण्याचा निर्णय घेतला. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात तनपुरे आघाडीवर होते, तसेच प्रबळ उमेदवार म्हणून त्यांचा नेहमीच उल्लेख होतो. मात्र, निवडणुकीपूर्वी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी त्यांची समक्ष भेट घेत चर्चा केली व त्यानंतर तनपुरेंनी थांबण्याचा निर्णय जाहीर केला. त्यावेळी भाजपकडून व विशेषतः विखेंकडून त्यांना पुनर्वसनाचा शब्द देण्यात आल्याची चर्चा होत आहे. त्यामुळे आता विधानपरिषद निवडणुकीत तनपुरेंची वर्णी महायुतीकडून लागण्याची शक्यताही व्यक्त होत आहे. तसे झाल्यास तनपुरे हे कोणत्या पक्षाचे उमेदवार ठरणार? याबाबत उत्सुकता व्यक्त होत आहे.

### जिल्ह्यात एकूण ४६१ मतदार

विधानपरिषद निवडणुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकनियुक्त प्रतिनिधी मतदान करतात. सध्या महापालिकेत ७३ नगरसेवक आहेत, तर जिल्ह्यात नगरपालिकांचे ३१२ व नगरपंचायतीचे ७६ नगरसेवक असे एकूण ४६१ जिल्हा परिषद निवडणुका लांबल्याने ७५ जिल्हा परिषद सदस्य व १२ पंचायत समिती सभापतींना निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता येणार नाही.

# चोरलेल्या टेम्पोसह आरोपी जेरबंद

### कोतवाली पोलिसांची स्वस्तिक बसस्थानक परिसरात कारवाई

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कोतवाली पोलिसांनी चोरलेल्या टेम्पोसह आरोपीला स्वस्तिक बसस्थानक परिसरातून जेरबंद केले आहे. जहिर सादिक शेख (वय १९, रा नारायणडोह ता. जि. नगर) असे आरोपीचे नाव आहे. दिनांक २० मे रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात टेम्पो चोरीला गेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

कोतवाली गुन्हे शोध पथकाचे पोसई प्रवीण पाटील व गुन्हे शोध पथकाचे पोलीस अमंलदार गुन्ह्याचा तपास करत असताना सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी हा टेम्पोसह नगर शहरातील स्वस्तिक बसस्थानकासमोर येणार असल्याची माहिती मिळाली. डायल ११२ प्रणालीला पण कॉल आल्याने पथकाने हे तात्काळ स्वस्तिक बसस्थानक येथे जाऊन टेम्पो (एमएच




१६ सीडी १६७५) पाठलाग करून ताब्यात घेतला. आरोपी जहीर शेख याला कोतवालीत हजर करण्यात आले असून, पुढील तपास पोहेकॉ संदीप पितळे हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक ■ पान ४ वर

# श्रीरामपूरमध्ये वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर कारवाई

### साडेआठ लाखांचा मुद्देमाल जप्त । दोघांवर गुन्हा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने श्रीरामपूर तालुक्यातील मालुंजे येथे अवैध वाळू वाहतूक करणा–यांविरुद्ध कारवाई करून एकूण आठ लाख चाळीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी डंपरचालक व मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक २० रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक श्रीरामपूर परिसरात पेट्रोलिंग करत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम डंपरमध्ये मालुंजे गावच्या शिवारातील प्रवरा नदीपात्रातून वाळूचा उपसा करुन तिची चोरटी वाहतूक करत आहे.

पथकाने तात्काळ मालुंजे शिवारातील बसस्टॅण्डजवळ सापळा रचून संशयित डंपर थांबवून चालक नीलेश वसंत गायकवाड (वय–२५ वर्षे रा. मालुंजे ता.श्रीरामपूर) याच्याकडे



चौकशी केली असता त्याने हा डंपर रणजित दिनकर बडाख (रा.मालुंजे ता. श्रीरामपूर) याचा असल्याचे ■ पान ४ वर

##### सर्व नागरिक क्षेत्रात सिटी सर्वे लागू करण्यासाठी नियोजन

# जुलैपासून ‘१५ दिवसांत मोजणी, ७ दिवसांत क परत’ प्रकल्प राबविणार- आयुक्त शैलेश नवल

### प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली काढण्यासाठी प्रभावी उपाययोजना; जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांची अहिल्यानगर भूमी अभिलेख कार्यालयास भेट



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्याचे जमाबंदी आयुक्त शैलेश नवाल यांनी अहिल्यानगर जिल्हा दौऱ्यादरम्यान भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाची सविस्तर पाहणी करत प्रलंबित मोजणी प्रकरणांचा आढावा घेतला. पारनेर व अहिल्यानगर तालुक्यातील प्रकरणे मुदतीत निकाली काढण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच सर्व नागरिक क्षेत्रात सिटी सर्वे लागू करण्यासाठी आवश्यक उपयोजना राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्ह्यातील वाढत्या मोजणी प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री व प्रशासकीय नियोजनाची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आयुक्त नवाल यांनी पारनेर व अहिल्यानगर येथील उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयांना भेट दिली. पारनेर तालुक्यात मोठ्या प्रमाणात आलेली मोजणी प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी जिल्ह्यातून अतिरिक्त भूकरमापक उपलब्ध करून देण्यात आले असून, परवानाधारक भूकरमापकांची मदत घेऊन प्रभावी नियोजन करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

पारनेरचे प्रभारी उपअधीक्षक भूमी अभिलेख जितेंद्र भिंगारदिवे यांनी राबविलेल्या नियोजनाची आयुक्तांनी पाहणी केली. पारनेर तालुक्यात मोजणी कामात चांगली प्रगती झाल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. तसेच मोजणी कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत त्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

यावेळी नागापूर परिसरातील सुरू असलेल्या मोजणी कामाची प्रत्यक्ष पाहणी करून आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर अहिल्यानगर उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास भेट देऊन प्रलंबित प्रकरणे योग्य नियोजनाद्वारे वेळेत निकाली काढण्याबाबत सूचना केल्या. नागरिकांच्या समस्या अधिक तत्परतेने सोडविण्यासाठी अधिक जोमाने ■ पान ४ वर

# शिर्डीमध्ये २३ ते २४ मे रोजी संरक्षण उत्पादनाच्या प्रदर्शनाचे आयोजन

### विद्यार्थी नागरिकांना रॉकेट आणि क्षेपणास्त्र पाहाण्याची संधी!

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**शिर्डी–** शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमिताने २३ आणि २४ मे २०२६ रोजी विद्यार्थी आणि नागरीकांसाठी संरक्षण साहीत्याच्या उत्पादनाचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.यामध्ये रॉकेट आणि क्षेपणास्त्र विशेष आकर्षण असणार आहेत.

देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या सावळीविहीर येथील औद्यगिक वसाहती मध्ये निबे गृपच्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवर कार्यक्रमास उपस्थित राहाणार आहेत. अहील्यानगर जिल्हयात प्रथमच कार्यान्वित होत असलेल्या प्रकल्पामुळे अहील्यानगर जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून भविष्यात ओळखला जाईल.या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफ गोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची क्षमता या कारखान्याची आहे. संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. ■ पान ४ वर

# कोठल्यात ३४० किलो गोमांस जप्त

### एलसीबीच्या कारवाईत एकावर गुन्हा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नगर शहरातील घासगल्ली, कोठला परिसरात सुरू असलेल्या कत्तलखान्यावर स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने छापा टाकून ३४० किलो गोमांस जप्त केले. या प्रकरणी एकावर तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक २० मे रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नगर शहरात पेट्रोलिंग करत असताना घासगल्ली, कोठला परिसरात गोवंशीय जनावरांची कत्तल करुन गोमांस विक्री होत असल्याची प्राप्त झाली. पथकाने तात्काळ घासगल्ली, कोठला येथे जाऊन खात्री केली असता, केजीएन चिकन शॉपच्या मागील बाजूस बोळीत एका पत्र्याच्या ■ पान ४ वर



## दै. आकर्षण निवडक

### बॅडमिंटन संघ निवडचाचणी स्पर्धा १९ पासून

अहिल्यानगर- जिल्हा बॅडमिंटन असोसिएशन आयोजित १७, १९ वर्षांच्या आतील आणि ओपन बॅडमिंटन मुलं व मुलींची जिल्हा संघ निवड चाचणी स्पर्धा आणि ११, १३, १५ वर्षांतील मुलं व मुली यांची जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा या दि. १९ ते २१ जून रोजी होणार आहेत. या स्पर्धांमध्ये १७, १९ व ओपन या संघांची निवड करण्यात येणार आहे. ११, १३, १५ वर्षांतील मुलं व मुली यांच्या जिल्हा अजिंक्यपद स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेमधून राज्य स्तरीय अंतर जिल्हा बॅडमिंटन स्पर्धांसाठी जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. सदर निवड स्पर्धा ही एकेरी, दुहेरी या प्रकारांमध्ये होणार आहे. यास्पर्धेत अधिकाधिक खेळाडूंनी सहभाग होण्याचे आवाहन अहमदनगर जिल्हा बॅडमिंटन असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अशोक कोठारी व उपाध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी केले आहे. सदर स्पर्धा महाराष्ट्र राज्य बॅडमिंटन असोसिएशनच्या नियमानुसार व अधिकृत पंचांच्या उपस्थितीत होणार आहेत. या स्पर्धेसाठी खेळाडूंना त्यांची नावनोंदणी ऑनलाईन पद्धतीने . या वेबसाइट वर करायची आहे अशी माहिती असो. चे सचिव मिलिंद कुलकर्णी यांनी सांगितले आहे. नावनोंदणीसाठी काही अडचण येत असेल, तर त्या खेळाडूंनी मिलिंद कुलकर्णी ९४२३९६२६३२ व वरून भालेराव ८२६१९६९२८५ या नंबरवर संपर्क करावा. नावनोंदणीची अंतिम तारीख १५ जून रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत असून त्यानंतर त्या खेळाडूंची नावे नोंदवली जाणार नाहीत. खेळाडूंची गटवार यादी . या वेबसाइट वर १७ तारखेला दिसणार असून त्यामध्ये खेळाडूंनी आपल्या नावाची खात्री करावी याची सर्व खेळाडूंनी नोंद घ्यावी.

### शालेय शिक्षक आभाळे यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार

अहिल्यानगर - येथील शालेय शिक्षक दत्तात्रय



पांडुरंग आभाळे यांना सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल 'राष्ट्रीय प्रेरणा पुरस्कार २०२६' जाहीर करण्यात आला आहे. नाशिक येथील ज्ञानदीप सामाजिक विकास संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव केला जाणार आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. २३ मे रोजी सायंकाळी ४ वाजता नाशिक येथील वावरेनगर, कामटवाडे येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रिपब्लिकन सेनेचे ॲड. अमन आंबेडकर (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पंतू), नाशिक पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, समाजकल्याण विभागाचे उपायुक्त भगवान वीर, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश गायकवाड, रिपब्लिकन सेनेचे राज्य प्रवक्ते अविनाश शिंदे तसेच मनपा सहाय्यक उपायुक्त नानासाहेब साळवे आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल आठवले आणि सचिव मिलिंद कळवणकर यांनी दिली. संगमनेर तालुक्यातील नांदूर खंदरमाळ येथील भगवती माता विद्यालयात कार्यरत असलेले दत्तात्रय आभाळे यांनी आपल्या कार्यातून शिक्षण आणि समाजसेवेचा अनोखा संगम घडवून आणला आहे. अकलापूर हे त्यांचे मूळ गाव असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. बालवयातच पितृछत्र हरपल्यानंतर आई आणि काकांच्या सहकार्याने त्यांनी शिक्षणाची वाटचाल सुरू ठेवली. आर्थिक आणि कौटुंबिक अडचणींवर मात करत शिक्षक होण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले. आज शिक्षक म्हणून कार्यरत असताना ते विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीव, नैतिक मूल्ये आणि आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. ग्रामीण भागातील अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी शैक्षणिक मदत व मार्गदर्शन करून शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही आभाळे यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. ग्रामीण युवकांमध्ये शिक्षणाबाबत जागृती निर्माण करणे, स्वच्छता अभियान राबविणे, पर्यावरण संवर्धन उपक्रमात सहभाग घेणे तसेच रक्तदान शिबिरांचे आयोजन अशा विविध सामाजिक उपक्रमांत त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

# सीए रमेश फिरोदिया यांचे जीवन कार्य अहिल्यानगरसाठी भूषणावह - नितीन चंगेडिया

### जीवन गौरव पुरस्काराबद्दल सीए रमेश फिरोदिया यांचा चंगेडिया परिवारातर्फे हृदय सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील प्रसिद्ध उद्योजक तथा सीए रमेश फिरोदिया यांना मुंबई येथे जैन सीए फेडरेशनचा प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल सीए रमेश फिरोदिया व सौ. सविता रमेश फिरोदिया यांचा चंगेडिया परिवारातर्फे सत्कार करण्यात आला. यावेळी नितीन चंगेडिया, सतीश चंगेडिया. जवाहरलाल चंगेडिया. मनोज चंगेडिया, सुभाष भंडारी, निर्मल गांधी, जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी, निखिल मुथा आदी उपस्थित होते.

नितीन चंगेडिया म्हणाले की, आमच्या चंगेडिया परिवाराचे व्याही असलेले सीए रमेश फिरोदिया यांचा पुरस्काराने झालेला सन्मान अभिमानास्पद आहे. एका छोट्याशा गावातून फिरोदिया यांनी आपल्या जीवन प्रवासाला सुरुवात करत मोठी गरूडझेप घेतली आहे. सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात ते सातत्याने योगदान देत असतात. त्यांनी आपल्या कर्तृत्वाने आपल्या गावाबरोबरच अहिल्यानगरचे नाव उंचावले आहे. ते खऱ्या अर्थाने अहिल्यानगरचे भूषण आहेत. साधूसंतांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा पगडा आहे. संपर्कात आलेल्या प्रत्येकाला त्यांचे अनमोल मार्गदर्शन लाभत असते. त्यांचा संपूर्ण जीवन प्रवास आणि कार्य आदर्शवत आहे.

सीए रमेश फिरोदिया म्हणाले, आयुष्यात स्वतः प्रगती करताना इतरांच्या प्रगतीसाठीही योगदान देण्यासारखा दुसरा आनंद नाही. आधुनिक काळात धार्मिक संस्कार आणि चांगले शिक्षण आवश्यक आहे. त्यामुळेच धार्मिक कार्यात योगदान देत असतो. नगरमध्ये मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी विशेष प्रयत्न असतो. पुरस्कारामुळे समाजासाठी आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. चंगेडिया परिवाराने पुरस्कार मिळाल्याबद्दल केलेला सन्मान आनंद द्विगुणित करणारा आहे.

# मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धेची नगरात रंगणार बौद्धिक लढत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा बुधवार दि. २७ मे ते रविवार दि. ३१ मे २०२५ या कालावधीत अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

या स्पर्धेत देशभरातील नामांकित बुद्धिबळपटू सहभागी होणार असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील दोनशेहून अधिक खेळाडूंनी आतापर्यंत आपला सहभाग निश्चित केला आहे. तसेच अनेक दिग्गज बुद्धिबळपटूही स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली.

विशेष म्हणजे अवघ्या साडेपाच वर्षांच्या बाल बुद्धिबळपटूपासून ते ७५ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक या स्पर्धेत आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असल्याचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत रशियन ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला असून बुद्धिबळप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव हे बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ९-३० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना सुद्धा खेळणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता होणार असून त्यानंतर स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या खेळविण्यात येणार आहेत. अंतिम बक्षीस वितरण समारंभ रविवार दि. ३१ मे रोजी दुपारी ३ वाजता अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे.

स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिके, आकर्षक ८५ करंडके तसेच सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे (जळगाव) कार्यभार सांभाळणार असून त्यांना पवन राठी (पुणे) सहाय्यक पंच म्हणून सहकार्य करणार आहेत. त्यांच्यासोबत ६ सहाय्यक पंचांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्पर्धा जागतिक बुद्धिबळ महासंघाच्या नियमावलीनुसार पार पडणार आहे. विशेष बाब म्हणजे या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर महाराष्ट्रात प्रथमच करण्यात येणार आहे.

### जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांचे वेतन रखडले

# संचमान्यता दुरूस्ती व इंटिग्रेट तात्काळ करावे - सचिन झगडे

### संचमान्यता तात्काळ 'इंटिग्रेट' करण्याची माध्यमिक शिक्षक संघाची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जिल्ह्यातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील संचमान्यता दुरुस्ती झालेल्या शंभराहून अधिक शाळांतील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अद्यापही रखडले असल्याने मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. संबंधित संचमान्यता शालार्थ प्रणालीमध्ये 'इंटिग्रेट' न झाल्यामुळे मे २०२६ महिन्याचे वेतन फॉरवर्ड होत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने याबाबत शिक्षण विभागाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सचिव अमोल ठाणगे आणि उपाध्यक्ष सोमनाथ सुंबे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी मुख्याध्यापक सुदाम दळवी, दीपक थोरात तसेच कोपरगाव तालुका संघटनेचे कैलास शेळके उपस्थित होते.

शिक्षक संघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही शाळांची सन २०२४-२५ या वर्षातील संचमान्यता पदे शून्य झाली होती. त्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक कामकाजात अडथळे निर्माण झाले होते. मात्र सन २०२५-२६ च्या संचमान्यतेमध्ये संबंधित शाळांना पुन्हा पदे मंजूर करण्यात आली असून त्यानुसार संचमान्यता दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

तथापि, संबंधित संचमान्यता अद्याप शालार्थ प्रणालीमध्ये 'इंटिग्रेट' करण्यात आलेली नाही. परिणामी संबंधित शाळांचे वेतन प्रस्ताव फॉरवर्ड होत नसून मे २०२६ चे वेतन रखडले आहे. अनेक शिक्षक व कर्मचाऱ्यांना घरखर्च, बँक कर्जाचे हप्ते, मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि दैनंदिन आर्थिक व्यवहार सांभाळताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षण विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन संचमान्यता तातडीने 'इंटिग्रेट' करावी व संबंधित शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन त्वरीत अदा करण्याची मागणी केली आहे. प्रशासकीय तांत्रिक कारणांमुळे शिक्षकांना वेतनापासून वंचित ठेवणे अन्यायकारक असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

शिक्षण विभागाने त्वरित कार्यवाही करून रखडलेल्या वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा शिक्षक संघटनेच्या वतीने पुढील तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.

# योगशिक्षक रामचंद्र लोखंडे यांचा 'छत्रपती संभाजी महाराज उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार'ने गौरव

### योग, ध्यान आणि व्यसनमुक्ती अभियानाचे कौतुक

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** समाजाला निरोगी व सकारात्मक जीवनशैलीकडे मार्गदर्शन करणारे योगशिक्षक रामचंद्र बाबूराव लोखंडे यांना धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने 'छत्रपती संभाजी महाराज उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. ग्रामीण भागात योग, प्राणायाम, सुदर्शन क्रिया आणि ध्यान यांचा प्रसार करून सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनजागृतीपर कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.

अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे आणि विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांच्या हस्ते रामचंद्र लोखंडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी साहित्यिक प्रतिभा खैरनार, युवा कीर्तनकार ह.भ.प. दिपाली गणगे-कोकाटे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत चाबुकस्वार, माजी सरपंच साहेबराव बोडखे, डॉ. विजय जाधव, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, उद्योजक दिलावर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

रामचंद्र लोखंडे हे ग्रामीण भागात सातत्याने योग, प्राणायाम, सुदर्शन क्रिया आणि ध्यानधारणा यांची शिबिरे आयोजित करून नागरिकांना शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन करत आहेत. ते 'आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेचे प्रशिक्षक असून, ग्रामीण युवक आणि नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

विशेषतः युवकांमध्ये वाढत चाललेले तणाव, नैराश्य आणि व्यसनाधीनतेचे प्रमाण कमी करण्यासाठी ते व्यसनमुक्ती विषयावर व्याख्याने देत जनजागृती करत आहेत. सकारात्मक विचार, आत्मविश्वास आणि मानसिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी योग आणि ध्यान किती महत्त्वाचे आहे, याविषयी ते सातत्याने मार्गदर्शन करतात. त्यांच्या शिबिरांमुळे अनेक युवकांमध्ये सकारात्मक बदल घडून येत आहे. समाज निरोगी, तणावमुक्त आणि सुसंस्कृत व्हावा या उद्देशाने सुरू असलेल्या त्यांच्या कार्याची दखल घेत धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने त्यांना 'छत्रपती संभाजी महाराज उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल रामचंद्र लोखंडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने अधिक मासनिमित्त

# अहिल्यानगर येथे ३ ते ५ जूनपर्यंत नऊकुंडी श्री विष्णुयाग कीर्तन, पारायण, प्रवचन यासह विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्री संत सद्गुरु सखाराम महाराजांच्या आशीर्वादाने व प.पूज्य. प्रसाद महाराजांच्या प्रेरणा मार्गदर्शन व उपस्थितीमध्ये दि. ३ ते ५ जून-२०२६ रोजी पुरुषोत्तम (अधिक) मास निमित्त बंधन लॉन्स, सावेडी , अहिल्यानगर येथे अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने ३ जून , ४ जून व ५ जून रोजी नऊ कुंडी श्री विष्णू याग, सामवेद व शुक्ल यजुर्वेद पारायण, श्री संत सद्गुरु सखाराम महाराज महाराज जीवन चरित्र व समाजसेवा या विषयावर आधारित ह.भ.प. महेश जोशी महाराजांचे प्रवचन तसेच ३ व ४ जूनला शिष्य मंडळींकडून प.पूज्य. गुरूवर्य प्रसाद महाराजांच्या तुला देखील करण्यात येणार आहेत, दिनांक ३ जून रोजी ह.भ.प. प्रकाश नंदगिरी महाराज देवगड संस्थान व ४ जून रोजी विद्याभूषण गुरुवर्य ह.भ.प. मुकुंद काका जाटदेवळेकर महाराज यांचा संत पूजनाचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक ३ जून रोजी रात्री ह. भ. प. ऋषिकेश महाराज यांचे सत्संग कीर्तन होईल व दिनांक ४ जून रोजी रात्री ह. भ. प. राम महाराज झिंजुर्गे यांचे सत्संग कीर्तन होणार आहे. त्याचबरोबर ५ जून रोजी ह. भ. प. गुरुराज महाराज देगलूरकर यांचे सकाळी काल्याचे किर्तन आयोजित केलेले आहे. त्याच वेळी प.पूज्य. गुरुवर्य प्रसाद महाराज हे आपणां सर्वांना अधिक मासातील धार्मिक विधींचे महत्त्व या विषयीच्या संबोधनातून *आशीर्वचन* देणार आहेत. या सर्व धार्मिक कार्यक्रमाबरोबरच दि. ३ जूनला स्वस्तिक हौस्पिटलच्या सहकार्याने आपण मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे, या शिबिरात नगर जिल्ह्यातील प्रसिद्ध नेत्र विकार तज्ञ डॉ. प्रफुल चौधरी हे नेत्र तपासणी करणार आहेतव दि. ४ जून रोजी आपण जन कल्याण रक्तपेढी, अहिल्या नगरच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबीर आयोजित केलेले आहे, व या वेळी साधारण पणे २०१ रक्तदात्यांकडुन उस्फुर्तपणे रक्तदान नक्की व्हावे अशा स्वरुपाचा संकल्प यावेळी समितीने केलेला आहे, यानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे. याचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा हि नम्र विनंती.

आपल्या या अधिक मासानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे पत्रिकेचे सर्व अमळनेरकर महाराजांच्या अ.नगर मधील शिष्य मंडळींच्या उपस्थितीत आपल्या नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर येथे विधीवत कार्यक्रम पत्रिका पूजन झाले .

# काटवन खंडोबा रोड परिसरातील नागरिकांचा पाणी प्रश्न पेटला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील काटवन खंडोबा रोड रोड, गाझी नगर व साई नगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल होत असताना नगरसेवक दत्ता गाडळकर यांनी मध्यरात्री स्वतः धाव घेत नागरिकांना दिलासा दिला. अगोदरच कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा, मुख्य जलवाहिनी फुटल्याने निर्माण झालेली अडचण आणि महावितरणच्या वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. अशा परिस्थितीत गाडळकर यांनी स्वतः उपस्थित राहून पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

परिसरातील अनेक भागांमध्ये नळांना पाणीच येत नसल्याने नागरिक संतप्त झाले होते. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी धावपळ करावी लागत होती. महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत असल्याने नागरिकांनी नगरसेवक दत्ता गाडळकर यांच्याकडे तक्रारींचा पाऊस पाडला. नागरिकांच्या अडचणीची गंभीर दखल घेत गाडळकर यांनी तत्काळ पाणीपुरवठा विभागाशी संपर्क साधत मध्यरात्रीच परिसरात भेट दिली.

रात्री उशिरापर्यंत त्यांनी स्वतः प्रत्येक भागात जाऊन पाणीपुरवठ्याची पाहणी केली. तब्बल रात्री १ वाजेपर्यंत परिसरात थांबून प्रत्येक घरापर्यंत पाणी पोहोचते का, याची खातरजमा केली. काही भागात कमी दाबाने पाणी येत असल्याचे निदर्शनास येताच त्यांनी पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांना तातडीच्या सूचना देत समस्या सोडविण्याचे सूचना केल्या. नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेत त्यांनी प्रशासनाकडेही पाठपुरावा सुरू केला.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक – तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### संशयास्पद ‘विशारद’ प्रमाणपत्रांवरून प्राथमिक शिक्षकांवर कारवाईची मागणी



अहिल्यानगर - जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या शिक्षण विभागात संशयास्पद पदवी प्रमाणपत्रांच्या आधारे पदोन्नती मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. प्रयाग अलाहाबाद संस्थेकडून हिंदी विषयात देण्यात आलेल्या ‘‘विशारद’’ पदवीच्या प्रमाणपत्रांचा वापर करून काही शिक्षकांनी पदोन्नती व बदलीचे लाभ मिळविण्याचा प्रयत्न केल्याची बाब समोर आल्याने संबंधितांची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी आरपीआयचे युवक कार्याध्यक्ष अजय बडोदे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की शिक्षण विभागामध्ये विविध अनियमितता व अनागोंदी कारभार सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही शिक्षकांकडून संशयास्पद अथवा खोट्या पदवी प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय लाभ मिळविण्याचा प्रयत्न केला जात असल्याने शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता धोक्यात येत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.निवेदनानुसार, ऑक्टोबर २०२३ मध्ये पार पडलेल्या केंद्रप्रमुख पदोन्नती प्रक्रियेदरम्यान जवळपास ८ ते १० मुख्याध्यापकांनी प्रयाग अलाहाबाद संस्थेचे डी.एड. समकक्ष अथवा बी.एड. संबंधित प्रमाणपत्रे जोडून पदोन्नतीचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, याबाबत शंका उपस्थित झाल्यानंतर संबंधित प्रमाणपत्रधारक शिक्षकांनी तात्काळ माघार घेतल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### रक्तदान हेच जीवनदान; मदत सोशल फाउंडेशनचा जनजागृती उपक्रम



अहिल्यानगर- जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथील हिमोटॉलॉजी विभागामध्ये रक्तदान शिबिर विषयक जनजागृती तसेच जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या रक्तटंचाईवर उपाययोजना यासंदर्भात मदत सोशल फाउंडेशनच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी मदत सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा अँड. मोनाश्री अहिरे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना नियमित रक्तदान करण्याचे जाहीर आवाहन केले. ‘‘रक्तदान हे समाजाप्रती असलेले सर्वात मोठे कर्तव्य असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात,’’ असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान जिल्हा रुग्णालयातील समन्वयक डॉ. आशिष इरमल यांनी थॅलेसेमिया, सिकल सेल आणि हिमोफिलिया यांसारख्या गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वारंवार रक्ताची आवश्यकता भासत असल्याची माहिती दिली. अनेक रुग्णांचे जीवन हे नियमित रक्तपुरवठ्यावर अवलंबून असल्याने समाजातील प्रत्येक नागरिकाने रक्तदानासाठी पुढे येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे अँड. मोनाश्री अहिरे यांनी स्वतः रक्तदान करून जनजागृती मोहिमेची सुरुवात केली. यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये रक्तदानाविषयी सकारात्मक संदेश पोहोचला. कार्यक्रमास अँड. तहसीन शेख, श्रीधर शेलार यांच्यासह मदत सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजासाठी महत्त्वाचे संदेश रक्तदानामुळे कोणताही शारीरिक त्रास होत नाही. नियमित रक्तदान केल्याने अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. थॅलेसेमिया व हिमोफिलिया रुग्णांसाठी रक्ताची सतत गरज असते. युवकांनी वाढदिवस, सामाजिक कार्यक्रम यानिमित्त रक्तदानाचा संकल्प करावा.

# शरद पवारांना शिवरायांची मूर्ती भेट

**‘आपला मावळा’च्या कार्याला नवी ऊर्जा । खासदार नीलेश लंके यांच्या उपस्थितीत शिवचरित्र संवर्धनाचा निर्धार**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात बुधवारी पार पडलेल्या एका विशेष कार्यक्रमात ‘आपला मावळा महाराष्ट्र’ संघटनेच्या वतीने आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती ज्येष्ठ नेते शरद पवार यांना सन्मानपूर्वक भेट देण्यात आली. या प्रसंगी खासदार नीलेश लंके यांनी उपस्थित राहून संघटनेच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक कार्याचा आढावा मांडला.

छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, त्यांचे लोककल्याणकारी राज्यकारभार, शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि संस्कृती यांचा वारसा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी ‘आपला मावळा महाराष्ट्र’ संघटना सातत्याने कार्यरत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विशेषतः युवकांमध्ये शिवचरित्राविषयी आकर्षण निर्माण व्हावे, इतिहासाचे भान वाढावे आणि महाराष्ट्राच्या परंपरेचा अभिमान जागृत व्हावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जात असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

कार्यक्रमात शरद पवार यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक करत उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. सामाजिक बांधिलकी जपत इतिहास संवर्धनाचे काम करणाऱ्या संस्थांची आज समाजाला आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केल्याचे उपस्थितांकडून सांगण्यात आले.

यावेळी खासदार नीलेश लंके यांनी भावना व्यक्त करत सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार हे केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन करणारे आहेत. ‘आपला मावळा’ संघटनेच्या माध्यमातून शिवरायांचा इतिहास घराघरांत पोहोचविण्याचा प्रयत्न सुरू असून, ग्रामीण भागातील युवकांमध्ये इतिहासाबाबत जागर निर्माण करण्यासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्याने आणि जनजागृती उपक्रम राबविले जात आहेत.

‘‘साहेबांनी दिलेली कौतुकाची थाप आणि शुभेच्छा आमच्यासाठी मोठी प्रेरणा आहे. या प्रेरणेतून शिवरायांचे विचार अधिक व्यापक पातळीवर पोहोचविण्यासाठी आम्ही अधिक जोमाने कार्य करू,’’ अशी भावना लंके यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला खासदार सुप्रिया सुळे, खासदार बजरंग सोनवणे, खासदार सुरेश म्हात्रे यांच्यासह ‘आपला मावळा’ संघटनेचे राज्य सचिव प्रा. सीताराम काकडे, सुरज मोरे, मोइन काश्मीरी आणि अन्य सहकारी उपस्थित होते.

कार्यक्रमात शिवरायांच्या कार्याची आठवण करून देत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे जतन करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला. समाजात सकारात्मक विचार आणि राष्ट्रप्रेमाची भावना वाढीस लागण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत अनेक मान्यवरांनी यावेळी मांडले.

# शहरात रस्त्यांचे जाळे निर्माण होत आहे - आमदार संग्राम जगताप

**गुलमोहर रोड रस्ता डांबरीकरण कामाचा शुभारंभ**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहर आता विकासकामांच्या माध्यमातून वेगाने बदलत असून विकासाची घोडदौड सुरू झाली आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे जाळे निर्माण होत असल्यामुळे उपनगरांमध्ये नागरिक वास्तव्यासाठी आकर्षित होत आहेत. नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामांमुळे विकसित शहराची निर्मिती होत आहे. गुलमोहर रोड हा शहरातील प्रमुख रेसिडेन्सी परिसर म्हणून ओळखला जात असून येथील नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विकासकामे प्राधान्याने केली जात आहेत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

गुलमोहर रोड रस्ता डांबरीकरण कामाचा शुभारंभ आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, माजी उपमहापौर गणेश भोसले, भाजप शहराध्यक्ष अनिल मोहिते, मनपा महिला बालकल्याण समिती उपसभापती वर्षाताई सानप, नगरसेविका गौरी बोरकर, माजी नगरसेवक अजिंक्य बोरकर, महेंद्र भैय्या गंधे, नगरसेवक निखिल वारे, प्रा. माणिक विधाते, नगरसेविका सोनाबाई शिंदे, अमोल गाडे, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, सुरेश बनसोडे, अशोक गायकवाड, कुमार नवले, सुनील त्रिंबके, भाजप शहर जिल्हाध्यक्ष प्रियाताई जानवे, नगरसेवक महेश तवले, रेवणाथ पवार, प्रकाश भागानगरे, शिवाजी डोके, नगरसेवक मनोज दुल्लभ, करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, सुमित कुलकर्णी, महेश लोंढे, सुशांत जाधव, अनिल ढवण आदींसह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप पुढे म्हणाले की, ‘‘पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते नुकतेच गुलमोहर रोडवरील स्ट्रीट लाईट कामाचे लोकार्पण करण्यात आले. आता रस्ता डांबरीकरणाच्या कामालाही सुरुवात झाली आहे. शहरातील डीपी रस्त्यांसोबतच कॉलनी अंतर्गत रस्त्यांची कामेही मोठ्या प्रमाणात मार्गी लागत आहेत. त्यामुळे संपूर्ण शहरामध्ये आधुनिक आणि दर्जेदार रस्त्यांचे जाळे निर्माण होत आहे.

# नवीपेठ येथील श्री जैन ओसवाल धर्मशाळेची नूतन कार्यकारिणी जाहीर

**अध्यक्षपदी बाळासाहेब भंडारी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील जैन समाजाच्या मालकीच्या नवीपेठ येथील श्री जैन ओसवाल धर्मशाळा.या प्रतिष्ठेच्या सामाजिक ट्रस्ट वर मा.धर्मदाय उपायुक्त यांचे आदेशाने १५ जणांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन विश्वस्तांची कार्यकारिणी सभा ज्येष्ठ विश्वस्त अजीत बोरा यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होऊन संस्थेच्या अध्यक्षपदी जैन ओसवाल समाजाचे जेष्ठ विश्वस्त चंद्रकांत रतनलाल भंडारी.(बाळासाहेब भंडारी) यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

त्याचबरोबर संस्थेच्या उपाध्यक्षपदी सतीश नेनसुख मुथा, सरचिटणीसपदी धनेश मोतीलाल भंडारी, कोषाध्यक्षपदी राजेंद्र पन्नालाल डागा, चिटणीसपदी संदीप सुरजमल चोपडा यांची एकमताने निवड करण्यात आली.. अजीत सिमरतमल बोरा,

मिलापचंद हरकचंद पटवा धनराज माणिकचंद गांधी, सतिश कनकमल चंगेडे, विजय मोतीलाल गुंदेचा, राजकुमार फुलचंद मुनोत, विनोद हिरालाल भंडारी, नरेश रतीलाल फिरोदिया, शिरीष कुंतीलाल कटारिया, सुरेश मदनलाल फिरोदिया यांची संस्थेवर विश्वस्त म्हणून निवड झाली आहे.

नूतन अध्यक्ष चंद्रकांत भंडारी म्हणाले की, जैन ओसवाल धर्मशाळेला मोठी वैभवशाली परंपरा आहे. आगामी काळात सर्वांना सोबत घेऊन संस्थेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. नवीन विश्वस्त मंडळ एकदिलाने काम करण्यासाठी कटिबद्ध आहे. त्यामुळे संस्था पुन्हा एकदा चांगल्या कामामुळे नावारूपाला येईल असा विश्वास आहे.

सन २०१७ पासुन अंतर्गत वादविवाद, अनधिकृत पदाधिकारी व अनधिकृत कामकाजामुळे बंद पडलेल्या जैन ओसवाल धर्मशाळाचे कामकाज पुन्हा सुरु होत असल्यामुळे समाजात आनंद व्यक्त होत आहे.

# राम–केवट भेटीतून समतेचा संदेश – ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे

**हरिहरेश्वर मंदिरात रामकथेचा भक्तिमय सोहळा उत्साहात; हजारो भाविकांची उपस्थिती**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** तपोवन, सूर्यनगर येथील हरिहरेश्वर मंदिर येथे ह.भ.प. श्रीनिवास महाराज घुगे (आळंदी) यांच्या मधुर वाणीतून आयोजित श्रीराम कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. सात दिवस चाललेल्या या धार्मिक सोहळ्यासाठी परिसरातील हजारो भाविकांनी उपस्थित राहून रामभक्तीचा लाभ घेतला.

कथे दरम्यान महाराजांनी प्रभू श्रीराम आणि केवट यांच्या भेटीचा प्रसंग अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत उलगडला. गंगेच्या पलीकडे प्रभू श्रीरामांना नावेतून पोहोचविणारा केवट हा भिल्ल समाजातील होता. मात्र प्रभू श्रीरामांनी त्याच्या जाती–पातीचा विचार न करता त्याला प्रेम, सन्मान आणि आपलेपण दिले. यामधून भगवान रामांनी समता, मानवता आणि भक्ती श्रेष्ठ असल्याचा संदेश दिल्याचे महाराजांनी सांगितले.

प्रभू श्रीरामांनी मोबदला म्हणून अंगठी देऊ केली असता केवटाने नम्रपणे नकार दिला. ‘‘प्रभू, माझा आणि तुमचा धंदा एकच आहे. तुम्ही संसाररूपी भवसागरातून लोकांना तारता, तर मी नदीतून लोकांना पार नेतो. मला कोणताही मोबदला नको, फक्त हा हात धरला तो



कधी सोडू नका,’’ असे केवटाने भावपूर्ण शब्दांत सांगितल्याचे वर्णन करताच अनेक भाविक भावूक झाले. ‘‘वनवास संपवून परत येताना मला विसरू नका, माझ्याच नावेतून प्रवास करा,’’ ही केवटाची विनवणी भक्तांच्या मनाला स्पर्शून गेली.

यावेळी महाराजांनी राजा दशरथांच्या दुःखद प्रसंगाचेही अत्यंत भावनिक वर्णन केले. प्रभू श्रीरामांना वनवासाला जावे लागल्याची बातमी ऐकताच दशरथ पूर्णपणे खचून गेले. पुत्रवियोगाच्या वेदनेत असताना त्यांना तरुणपणी घडलेली श्रावण बाळाची घटना आठवली. चुकून श्रावण बाळाचा बाण लागून मृत्यू झाल्यानंतर त्याच्या अंध आई–वडिलांनी दिलेला शाप ‘‘जसा आम्हाला पुत्रवियोग सहन करावा लागत आहे, तसाच मृत्यू तुलाही पुत्रवियोगाने येईल,’’ – त्यांच्या मनात घुमू लागला. राम... राम... अशी आर्त हाक देत, डोळ्यांत अश्रू आणि अंतःकरणात असह्य वेदना घेऊन दशरथांनी अखेरचा श्वास घेतल्याचे वर्णन ऐकून अनेक भाविकांचे डोळे पाणावले.

महाराजांनी सांगितले की, समाजात कोणताही मनुष्य मोठा किंवा लहान नसतो. भक्ती, प्रामाणिकपणा आणि मानवतेची भावना हाच खरा धर्म आहे. श्रीरामांनी भिल्ल केवटाला दिलेला सन्मान हा सामाजिक समतेचा आदर्श संदेश असल्याचे त्यांनी नमूद केले. रामनामाच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. संयोजक सूर्यनगर परिसरातील सर्व ग्रामस्थांनी भाविकांसाठी पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था, प्रकाश व्यवस्था तसेच शिस्तबद्ध नियोजन करून उत्तम सेवा दिली. त्यामुळे संपूर्ण सोहळा भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# स्टार हेल्थनेमहाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करून पूर्ण केली २० वर्षे; ४५०० हून अधिक व्यक्तींची तपासणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आपल्या सेवा क्षेत्रातील २० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने (: ; :५४३४१२) महाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केलीआहेत. याद्वारे स्थानिक समुदायांपर्यंत मुलभूत तपासणी, आरोग्यजागरूकता आणि आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करण्याची सुविधा पोहोचवण्यातआली. पुणे,सातारा, अहिल्यानगर, बारामती,दौंड, कोल्हापूर, धुळे,छत्रपती संभाजीनगर, जळगाव,अकोला, नांदेड, लातूर,धाराशिव, नंदुरबारआणि बीड येथे हा उपक्रम राबवण्यात आला, जेथेवेळेवर निदान आणि सक्रिय आरोग्य सेवेची व्यापक उपलब्धतावाढवण्यावर भर देण्यात आला.या बहु–शहरी संपर्क मोहिमेचा भाग म्हणून, स्टारहेल्थने ४,५०० हून अधिक सहभागींना आरोग्य तपासणी सुविधा पुरवल्या. यामध्ये रक्तदाब तपासणी,रक्तातील साखरेची चाचणी,बीएमआय मूल्यमापन, डोळ्यांची तपासणी आणिसामान्य डॉक्टरांच्या सल्ल्याचा समावेश होता. पुढील वैद्यकीय उपचारांची आवश्यकताअसलेल्या व्यक्तींना त्यांच्या रिपोर्टनुसार मार्गदर्शन करण्यात आले आणिआवश्यकतेनुसार अतिरिक्त सल्ल्यासाठी संदर्भित करण्यातआले. या उपक्रमाचा लाभ ग्राहक,सल्लागार,कर्मचारी आणि स्थानिक समुदायातील वंचित घटकांना मिळाला; ज्यामध्ये आजारांना प्रतिबंध करणे, लवकर निदान करणे आणिआरोग्य जागरूकतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.आरोग्य साक्षरता आणि घरगुती आरोग्य सेवेबद्दल जागरूकतावाढवण्यासाठी,स्टार हेल्थने डॉक्टर आणि समुदायांमध्ये ज्ञान–सामायिकीकरणसत्रांचेही आयोजन केले होते. यामुळे सहभागींना लवकर निदान, उपचारांचेमार्ग आणि वेळेवर वैद्यकीय मदतीचे महत्त्व अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदतझाली. या उपक्रमाला स्थानिक डॉक्टर,



डायग्नोस्टिक सेंटर्स आणिपॅनेलवरील आरोग्य सेवा भागीदारांचे सहकार्य लाभले.या उपक्रमाच्या व्यापक महत्त्वाबाबत मत व्यक्त करत स्टार हेल्थ इन्शुरन्सचे पूर्णवेळ संचालक श्री. हिमांशूवालियाम्हणाले,‘‘गेल्या २० वर्षांत,स्टार हेल्थने लाखो कुटुंबांना केवळ क्लेमच्या वेळीच नव्हे, तर त्यांच्या आरोग्य आणि वेलनेसच्या संपूर्ण प्रवासात साथ देऊन त्यांचाविश्वास संपादन केला आहे. यासारखे उपक्रम समुदायांप्रती असलेल्या आमच्यावचनबद्धतेची व्याप्ती आणि खोली दर्शवतात; तसेच अधिक जागरूकतानिर्माण करण्यास,लवकर निदान करण्यास प्रोत्साहित करण्यास आणि आरोग्य सेवांचीउपलब्धता सुधारण्यास मदत करतात. महाराष्ट्रात आमच्या प्रबळ उपस्थितीसह, आम्ही आरोग्य विमा आणि व्यापक आरोग्य व वेलनेस प्रयत्नांच्या माध्यमातूनलोकांपर्यंत पोहोचण्यावर आमचे लक्ष केंद्रित ठेवत आहोत.’’या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत स्टारहेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री.विजय अरोराम्हणाले,‘‘महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि वैविध्यपूर्ण राज्यात, हायपरटेंशन(उच्च रक्तदाब),मधुमेह आणि लठ्ठपणा यांसारखे जीवनशैलीशी संबंधित धोके अधिकगंभीर होण्यापूर्वीच ते ओळखण्यात कम्युनिटी आउटरीच महत्त्वाचीभूमिका बजावते. या शिबिरांच्या माध्यमातून, आम्हीसंपूर्ण राज्यातील लोकांच्या राहण्याच्या आणि कामाच्या ठिकाणापर्यंत सक्रिय आरोग्यसेवा,मुलभूत तपासणी आणि आरोग्य जागरूकता पोहोचवत आहोत. हा उपक्रममहाराष्ट्रातील विविध समुदायांसाठी आरोग्य सेवा अधिक सुलभ बनवण्याच्या आमच्या निरंतरवचनबद्धतेचे प्रतीक आहे.’’स्टार हेल्थसाठी महाराष्ट्र ही एक महत्त्वाची बाजारपेठराहिली आहे. एकट्या याच राज्यात कंपनीने गेल्या २० वर्षांत १३,७८९ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे २६.४ लाखांहून अधिक क्लेम्स (दावे)निकाली काढले आहेत. तसेच,महाराष्ट्रात कंपनीच्या ८७ शाखा, ३,४०० हून अधिक भागीदार रुग्णालयांचे नेटवर्क, १.२३लाखांपेक्षा जास्त सल्लागारआणि ५८ स्टार ग्रामीण विमा केंद्रे कार्यरतआहेत.क्लेम्स निकाली काढण्यापलीकडे जाऊन, स्टारहेल्थ डिजिटल आणि आरोग्य सेवा उपक्रमांच्या माध्यमातून एक व्यापक आरोग्य भागीदारम्हणून आपली भूमिका पक्की करत आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये, स्टार हेल्थच्या १ दशलक्षपेक्षा जास्त ग्राहकांनी टेलिमेडिसिन, आरोग्य तपासणी आणि एआयआधारित आरोग्य स्क्रीनिंग साधनांसह कंपनीच्या डिजिटल आरोग्यसेवांचा वापर केला.स्टार हेल्थचा सीएसआर आधारितप्राथमिक आरोग्य सेवा उपक्रम आरोग्य सेवा केंद्रच्या माध्यमातून कंपनीअपुऱ्या सोयी–सुविधा असलेल्या समुदायांपर्यंत विनामूल्य आरोग्य सेवांचा विस्तारकरत आहे. ही केंद्रे मोफत डॉक्टरांचा सल्ला, औषधे,निदानात्मक चाचण्या, आरोग्य तपासणी,समुपदेशन आणि फॉलो–अप सपोर्ट प्रदान करतात;ज्यामुळे समुदाय स्तरावर प्राथमिक निगामधील त्रुटी दूरकरण्यास मदत होते. महाराष्ट्रात हा उपक्रम ४ एएसके केंद्रे आणि १ एएसके+ केंद्रासह एकूण ५ केंद्रांच्यामाध्यमातून नाशिक,सांगली, सातारा, अकोला आणि कोल्हापूर येथे कार्यरत आहे.

# राम, कृष्णाचा विचार तर हरी उच्चारातच समाधानी जीवनाचे गमक - राजेंद्र टाक

## आनंदाश्रमात रामकृष्णहरी कथा सोहळा उत्साहात





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रभू श्री रामाचे आचरण, भगवान श्री कृष्णनिती आणि हरिस्मरण– नामसंकीर्तन यातच आनंदी आणि समाधानी जीवनाचे गमक असल्याचे प्रतिपादन कथाअभ्यासक तथा गायक - वक्ता राजेंद्र टाक यांनी केले. पारनेर तालुक्यातील आनंदाश्रम रायतळे येथे आयोजित त्रिदिन राम कृष्ण हरी या कार्यक्रमात ते बोलत होते. अधिकमासानिमित्ताने दि. १७ ते दि. १९ मे मी दरम्यान या संगीत कथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कथेच्या पहिल्या दिवशी बोलताना ते म्हणाले, श्रीरामकथेमधून आपल्याला जीवन जगण्याचे अनेक मौल्यवान बोध मिळतात, जे आजच्या काळातही तितकेच महत्वाचे आहेत. रामायण हे महाकाव्य नव्हे तर आदर्श जीवन जगण्याची दिशा आहे. तर दुसऱ्या दिवशी भगवान श्रीकृष्ण समजावून सांगताना ते म्हणाले बुद्धीमान, धर्माधारित व परिस्थितीनुरूप योग्य कृती करण्याची शिकवण भगवान श्रीकृष्णाने दिली. त्यांनी नेहमी धर्म, कर्तव्य, प्रेम, सत्य आणि व्यवहारज्ञान यांचा समतोल राखण्याचा संदेश दिला. तर कथा सांगता करताना ते म्हणाले मातापित्यांच्या ऋणाची जाण जो राखतो, सेवा आणि दयाभावाचा अंगीकार करून अहंकाराचा त्याग जो करतो, तोच वारकरी आणि त्यालाच पावतो हरी असेही श्री टाक यांनी सांगितले.

रायतळे आणि पंचक्रोशीतून आलेल्या साधुसंतांची, आध्यात्मिक क्षेत्रातील अनेकांची उपस्थिती या सोहळ्यास लाभली. अनेक भाविक भक्तांनी या दिव्य कथा श्रवण सोहळ्याचा लाभ घेतला. आश्रमाच्या वतीने ह. भ. प. राघवानंद महाराज यांनी देवस्थानच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. या प्रसंगी सुपा पोलिस ठाण्याच्या पी आय गडकरी मॅडम, भाजपा पारनेर तालुकाध्यक्ष श्री. राहुल शिंदे, पंचायत समितीचे माजी सभापती श्री. अशोक झरेकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. भाविकांनी रोज महाप्रसादाचा लाभ घेतला. आश्रमाच्या सर्व साधकांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता कष्ट घेतले. कथा सांगता प्रसंगी आभारप्रदर्शन उद्योजक श्री. बापूसाहेब डोके यांनी केले.

# पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सात्विक दातीर यशस्वी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा () इयत्ता ८ वीमध्ये श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, सवेडी येथील विद्यार्थी सात्विक निशांत दातीर याने २३४ गुण (७८ टक्के) मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे शाळा परिसरासह शैक्षणिक क्षेत्रात त्याचे सर्वत्र कौतुक होत असून दातीर व कजबे परिवाराकडून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सात्विकच्या या यशाने विद्यार्थ्यांसमोर मेहनत, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर यश मिळविता येते, याचे उत्तम उदाहरण निर्माण झाले आहे.

सात्विक दातीर हा अभ्यासात सातत्य राखणारा तसेच त्याने नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय रगबी या खेळात जिल्हाचे प्रतिनिधित्व केले होते.शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारा विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेसारख्या स्पर्धात्मक परीक्षेसाठी त्याने नियमित अभ्यास, सराव आणि नियोजनबद्ध तयारी केली होती. त्याच्या या यशामागे श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला सवेडी येथील शिक्षकांचे विशेष मार्गदर्शन लाभले. शाळेच्या मुख्याध्यापिका वसुंधरा जोशी यांनी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला असून उपमुख्याध्यापक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनीही सातत्याने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या परीक्षेच्या तयारीदरम्यान शिक्षक अनुराधा शास्त्री आणि भोराजी पथवे यांनी सात्विकला विषयानुरूप मार्गदर्शन करत त्याचा आत्मविश्वास वाढविला. तसेच महेश डाळिंबकर सरांचेही त्याला विशेष मार्गदर्शन लाभले. शिक्षकांनी दिलेल्या अभ्यासपद्धती, नियमित चाचण्या आणि शंकानिरसनामुळे सात्विकला परीक्षेत उत्कृष्ट गुण मिळविणे शक्य झाले. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षांबाबत आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी शाळेकडून सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले.

सात्विकचे वडील पत्रकार निशांत वसंतराव दातीर आणि आई इंजिनियर शोभा निशांत दातीर यांनी मुलाच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले. मुलाने अभ्यासात सातत्य ठेवून मेहनतीच्या जोरावर हे यश मिळविल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. सात्विकच्या या यशाबद्दल विधापरिषदेचे सभापती ना. प्रा राम शिंदे, शाळेचे शिक्षक, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# उत्कृष्ट तपासासाठी हेड कोतवाली पोलिस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल

## विशाल दळवी यांचा जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या हस्ते विशेष सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यातील खुनाच्या क्लिष्ट आणि आव्हानात्मक गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींना अटक करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याबद्दल कोतवाली पोलीस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल विशाल अशोक दळवी यांना अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाच्या वतीने प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.
दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी भिंगार कॅम्प पोलीस ठाणे गु.र.नं. २२२/२०२६, बीएनएस कलम १०३(१), २३८ (३) (५) अंतर्गत दाखल असलेल्या गुन्ह्याचा तपास करताना मिसिंग व्यक्ती प्रसाद रोहिदास जाधव यांचा खून झाल्याचे उघडकीस आले. आरोपींनी वाकोडी शिवारातील उसाच्या शेतात लाकडी दांडक्याने मारहाण करून त्यांचा खून करून मृतदेह टाकून दिला होता.

या प्रकरणात गुप्त माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास करत विशाल दळवी यांनी आरोपींचा शोध घेतला. आरोपी शुभम हरि भोसले (वय २०, रा. वाकोडीफाटा) आणि समाधान उर्फ बाळ्या रामदास सोनवणे (वय ४२, रा. बुरुडगाव) यांना अटक करून गुन्ह्याचा छडा लावण्यात आला.

विशाल दळवी यांनी केलेली कामगिरी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलासाठी अभिमानास्पद असल्याचे नमूद करत, भविष्यातही अशीच उल्लेखनीय कामगिरी करून पोलीस दलाची प्रतिमा उंचावावी, अशा शुभेच्छा प्रशस्तीपत्रातून देण्यात आल्या.

हे प्रशस्तीपत्र अप्पर पोलीस अधीक्षक मा. वैभव कलुबर्मे तसेच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन (भा.पो.से.) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

# जनगणना देशाच्या विकासाचा पाया– संभाजी कांडेकर

## नेप्ती परिसरात भर उन्हात शिक्षकांची जनगणनेसाठी पायपीट, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती व परिसरातील निमगाव वाघा, हिंगणगाव, हमीदपूर,जखणगाव आदी भागात भारतीय जनगणना २०२७ नुसार १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ अखेर महाराष्ट्रात घरयादी व घरगणना करण्याचे आदेशित करण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्ष जनगणना मोहिमेला सुरुवात झाली आहे. नेप्ती व परिसरातही जनगणना कार्य उत्साही वातावरणात सुरू असून ग्रामस्थांकडून या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

भर उन्हात शिक्षकांनी घरोघरी जाऊन नागरिकांची माहिती संकलित करण्याचे काम अत्यंत प्रामाणिकपणे सुरू ठेवले आहे. गावातील नागरिक शिक्षकांना सहकार्य करत असून अनेक ठिकाणी चहा, पाणी व अल्पोपहाराची व्यवस्था करून त्यांचे स्वागत करत आहेत अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.
नेप्ती येथील प्रगणक यादी गट क्र. २६१ मध्ये जनगणना प्रगणक शिक्षक श्री बाळासाहेब भाऊसाहेब कड व संभाजी कांडेकर सर यांनी प्रत्येक घरोघरी जाऊन जनगणनेतील ३४ प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते रामदास फुले, शंकर फुले,जानकाबाई फुले व अन्य मान्यवर उपस्थित होते.

कुटुंबातील सदस्य संख्या, शैक्षणिक स्थिती, रोजगार, निवास व्यवस्था तसेच विविध सामाजिक बाबींची माहिती काळजीपूर्वक नोंदवण्यात आली. कडक उन्हामुळे शिक्षकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असला तरी ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे जनगणनेचे काम अधिक वेगाने आणि प्रभावीपणे सुरू असल्याचे चित्र दिसून आले.

यावेळी शिक्षक संभाजी कांडेकर यांनी नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, ‘‘जनगणना ही केवळ आकडेवारी गोळा करण्याची प्रक्रिया नसून देशाच्या विकासाचा पाया आहे.

### दिव्यांग बांधवांच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध

# संजय गांधी निराधार योजनेची पेन्शन रु. ५००० करण्यासाठी पाठपुरावा करणार -आमदार अक्षय कर्डिले

## भाजपा दिव्यांग विकास आघाडीच्या वतीने आमदार अक्षय कर्डिले यांचा सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा मतदारसंघातून नुकतेच निवडून आलेले आमदार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांचा भाजपा दिव्यांग विकास आघाडी, अहिल्यानगर जिल्हाच्या वतीने स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हाभरातील दिव्यांग बांधव, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात उपस्थिती दर्शवत आमदार कर्डिले यांना पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक चर्चा झाली.

यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले यांनी दिव्यांग, निराधार आणि गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले साहेब यांनी नेहमीच अग्रक्रमाणे मदत केली, तसेचं जास्तीत जास्त शासकीय सवलती व सुविधा त्यांच्या पर्यंत पोहचवण्यासाठी जिल्हा अध्यक्ष वसंत शिंदे सर यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले,आपणही प्राधान्याने तेंच काम करणार असल्याचे सांगितले.

‘‘संजय गांधी निराधार योजनेतील जेष्ठ नागरिक, विधवा माता भगिनींनीसाठी सध्या असलेली वार्षिक उत्पन्न मर्यादा २१ हजार रुपये अत्यंत अपुरी आहे. वाढती महागाई आणि बदललेली आर्थिक परिस्थिती लक्षात घेता ही किमान एक लाख रुपये करण्यात यावी, असें निवेदन भाजपा दिव्यांग विकास आघाडी यांच्या वतीने आमदार कर्डीले यांना देण्यात आले. निवेदन स्वकरल्यानंतर आमदार साहेबांनी यासाठी येत्या अधिवेशनात शासनाकडे निवेदन सादर करणार आहे,’’ असे त्यांनी स्पष्ट केले. शासनाच्या विविध योजना खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार कर्डिले म्हणाले की, दिव्यांग बांधवांना केवळ सहानुभूती नको तर संधी, सन्मान आणि स्वावलंबनाची गरज आहे. रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि शासकीय योजनांमध्ये त्यांना प्राधान्य मिळावे यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. दिव्यांगांच्या अडचणी समजून घेऊन प्रशासन स्तरावर ठोस निर्णय घेण्यासाठी मी सदैव उपलब्ध राहीन. त्यांच्या या भूमिकेला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाचे नेतृत्व भाजपा दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष वसंत शिंदे यांनी केले. आपल्या मनोगतात ते म्हणाले की, ‘‘आमदार अक्षय कर्डिले हे सर्वसामान्य, दिव्यांग आणि वंचित घटकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व आहे. त्यांच्या माध्यमातून दिव्यांगांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जातील, अशी आम्हाला अपेक्षा आहे.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत काळे, जिल्हा उपाध्यक्ष ईश्वर गुंड, तालुका अध्यक्ष श्रीकांत काळे, शहर अध्यक्ष विजय पडोळे, नगर तालुका उपाध्यक्ष श्री.संदिप विटकर,नगर शहर उपाध्यक्ष अक्षय डहाळे श्री.रघुनाथ धनवडे, श्री.मोहसीन शेख, स्वामी पडोळे, इत्यादी जिल्हा पदाधिकारी यांच्यासह अनेक दिव्यांग बांधव आणि भगिनी स्व. आमदार शिवाजीराव कर्डीले यांच्यावर प्रेम असणारे असंख्य एकनिष्ठ कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमात आमदार कर्डिले यांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी किल्ला चौक ते बुऱ्हाणनगर ते छत्रपती संभाजी नगर रोडला जोडल्या जाणाऱ्या रस्त्याला ‘‘कार्यसम्राट आमदार शिवाजीराव कर्डीले मार्ग‘‘ असें नाव देण्याचा प्रस्ताव संघटनेच्या वतीने आमदार अक्षय कर्डीले यांना देण्यात आला.

### मांडवेच्या कन्येची अभिमानास्पद भरारी

# सारिका निमसे–सस्ते यांची गटविकास अधिकारीपदी निवड

## शेतकरी कुटुंबातील लेकीने जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या बळावर गाठले यशाचे शिखर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील मांडवे या छोट्याशा गावातील शेतकरी कुटुंबातील कन्या कु. सारिका संपत निमसे–सस्ते यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या () परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत गटविकास अधिकारी (वर्ग–१) पदावर निवड मिळवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशामुळे मांडवे गावासह संपूर्ण नगर तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सारिका निमसे–सस्ते यांचे प्राथमिक शिक्षण मांडवे येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी गावातील काकासाहेब म्हस्के विद्यालयात माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी नगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाची निवड केली. घरची आर्थिक परिस्थिती साधी असतानाही त्यांनी शिक्षणाची जिद्द कायम ठेवत डी.एड. पूर्ण केले आणि शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाल्या.

शिक्षक म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले. शाळेची जबाबदारी, कौटुंबिक कर्तव्ये आणि स्पर्धा परीक्षांचा अभ्यास यांचा उत्कृष्ट समतोल साधत त्यांनी सातत्याने एमपीएससीचा अभ्यास सुरू ठेवला. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी २०२२ मध्ये शाळा निरीक्षक (सीडीपीओ) पदासाठी यश मिळवले. मात्र, तेथेच न थांबता अधिक मोठ्या ध्येयासाठी त्यांनी आपले प्रयत्न अविरत सुरू ठेवले.

२०२४ मध्ये महिला बालविकास अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतरही त्यांनी अभ्यासात खंड पडू दिला नाही. अखेर २०२६ मध्ये जाहीर झालेल्या निकालात गटविकास अधिकारी (–) पदावर निवड होऊन त्यांनी आपल्या स्वप्नांना यशाची सुवर्णमुद्रा दिली.

त्यांच्या या यशामागे वडील संपतराव निमसे, आई लताबाई निमसे, पती अश्रूकांत सस्ते तसेच संपूर्ण कुटुंबीयांचे मोलाचे सहकार्य लाभले. पुणे येथील पुतणे संकेत निमसे यांचे मार्गदर्शन आणि बहिणी सावित्री निमसे यांचा प्रेरणादायी सहवासही त्यांच्या यशात महत्त्वाचा ठरला.

# पैठणमध्ये इंधनटंचाईचा गैरफायदा; एमआयडीसी परिसरातील काही पंपांवर चढ्या दराने विक्रीचा आरोप

## रात्री उशिरा गुपचूप पेट्रोल–डिझेल विक्री; वाहनधारक व शेतकऱ्यांमध्ये संताप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरासह तालुक्यात पेट्रोल आणि डिझेल टंचाईचे संकट अधिक गडद होत असून, या परिस्थितीचा काही पेट्रोल पंप चालकांकडून गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोप वाहनधारकांकडून केला जात आहे. विशेषतः पैठण एमआयडीसी परिसरातील काही पंपांवर रात्री उशिरा चढ्या दराने इंधन विक्री होत असल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

गेल्या तीन दिवसांपासून अनेक पेट्रोल पंपांवरील इंधनसाठा संपल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शहरासह ग्रामीण भागातील वाहनधारकांना पेट्रोल–डिझेलसाठी एका पंपावरून दुसऱ्या पंपावर भटकंती करावी लागत असून, काही ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र दिसून येत आहे.

दरम्यान, दिवसा इंधन उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असताना रात्रीच्या वेळी कॅन व बॅरलमधून जादा दराने इंधन विक्री होत असल्याचा आरोप वाहनधारकांनी केला आहे. काही ठिकाणी प्रति लिटर अधिक पैसे आकारले जात असल्याचीही चर्चा असून, आवश्यक तेवढे इंधन मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. खरीप हंगाम तोंडावर आल्याने शेतकरी मशागतीच्या कामात व्यस्त आहेत.

(पान १ वरून)

## चोरलेल्या टेम्पोसह आरोपी जेरबंद

मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवालीचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, तसेच गुन्हे शोध पथकातील पोसई प्रवीण पाटील, पोहेकॉ बाळकष्ण दौंड, पोहेकॉ विनोद बोरगे, पोहेकॉ राहुल शिंदे, पोहेकॉ साबीर शेख, पोहेकॉ विशाल दळवी, पोहेकॉ विजय ठोंबरे, पोकॉ दत्तात्रय कोतकर, पोकॉ सचिन लोळगे, पोकॉ शिरीष तरटे, पोकॉ अतुल काजळे, पोकॉ अमोल गाडे, पोकॉ दीपक रोहकले, पोकॉ सूरज कदम, पोकॉ सत्यम शिंदे, पोकॉ रमेश शिंदे, पोकॉ अतुल लाटे, पोकॉ याकुब शेख, मपोकॉ पल्लवी रोहकले, मोबाईल सेलचे पोकॉ राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

## श्रीरामपूरमध्ये वाळू वाहतूक करणाऱ्या डंपरवर कारवाई

सांगितले. डंपरमध्ये चाळीस हजार रुपये किमतीची चार ब्रास वाळू व आठ लाख रुपये किमतीचा डंपर असा एकूण ८ लाख ४० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. डंपरमालक रणजित बडाख हा फरार असून, त्याचा शोध सुरू आहे. आरोपीविरुध्द श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आत्तार, विशाल तनपुरे यांच्या पथकाने केली.

## जुलैपासून ‘१५ दिवसांत मोजणी, ७ दिवसांत क परत’ प्रकल्प राबविणार- आयुक्त शैलेश नवल

काम करण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.जिल्ह्यातील मोजणी प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी माहे जुलैपासून ‘‘१५ दिवसांत मोजणी व पुढील ७ दिवसांत क परत पुरविणे’’ हा विशेष प्रकल्प राबविण्याबाबत आवश्यक सूचना आयुक्त नवाल यांनी दिल्या. यासंदर्भात सर्व तालुक्यातील उपअधीक्षक भूमी अभिलेख अधिकारी यांची बैठक घेऊन कार्यपद्धती निश्चित करण्यात आली. तसेच सर्व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घेत प्रभावी अंमलबजावणीवर भर देण्यात आला.जिल्हा दौरा यशस्वी करण्यासाठी जिल्हा अधीक्षक संजय कुंभार, उपअधीक्षक भूमी अभिलेख अविनाश मिसाळ तसेच भूमापन अधिकारी जितेंद्र भिंगारदिवे, भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेचे नाशिक विभागीय अध्यक्ष रवी डीक्रूज यांनी विशेष प्रयत्न केले. भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेच्या नाशिक विभागाच्या वतीने विभागीय अध्यक्ष रवी डीक्रूज यांनी आयुक्त शैलेश नवाल यांचे स्वागत करून संघटनेच्या कामकाजाची माहिती दिली.

## शिर्डीमध्ये २३ ते २४ मे रोजी संरक्षण उत्पादनाच्या प्रदर्शनाचे आयोजन

हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे. शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत असून यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत. उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी सकाळी साडेदहा ते पाच या वेळेत विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत.यासाठी मोठे स्टॉल प्रकल्पस्थळावर उभारण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शालेय महाविद्यालयीन विद्यार्थी विज्ञानप्रेमी, नागरिक, महीला या प्रदर्शनाला भेट देतील व तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही मोठी संधी निर्माण करुन देण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून, रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. संरक्षण उत्पादन प्रकल्पामुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार आहे.

## कोठल्यात ३४० किलो गोमांस जप्त

खोलीमध्ये गोमांसासह इस्माईल अजमुद्दीन शेख (वय ५५ वर्षे, रा. घासगल्ली कोठला) हा आढळून आला.

पथकाने ६८ हजार रुपये किमतीचे ३४० किलो गोमांस, २० हजार रुपये किमतीचे डीपफ्रीज, २५ हजार रुपये किमतीचे गोमांस खिमा तयार करण्याचे मशीन, १० हजारांचे दोन इलेक्टिक वजन काटे व कत्तलीचे साहित्य असा एकूण एक लाख २४ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपीविरुध्द तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, २२३, ३(५) प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(ब), ५(क), ९ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच पथकातील उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, अंमलदार शाहिद शेख, योगेश भिंगारदिवे, गणेश धोत्रे, अरविंद भिंगारदिवे यांच्या पथकाने केली.